भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक तेरावा पीक सल्ला
# (कालावधी ०३ सप्टेंबर ते ०९ सप्टेंबर २०२६)

## अ. मातीचे आरोग्य, अन्नद्रव्ये, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण शिफारसी

कापसाचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी मातीतील अन्नद्रव्यांचा संतुलित पुरवठा, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षणावर आधारित प्रतिबंधात्मक व प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाची योग्य वाढ व जोम टिकून राहतो, निविष्ठांचा खर्च कमी होतो आणि किडी व रोगांमुळे होणारे मोठे नुकसान टाळता येते.

### मातीचे आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (INM)

- **मुख्य अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन:** पीक फेरपालट, सेंद्रिय द्रव्यांचा वापर आणि आच्छादित पिकांचा अवलंब करून मातीचे आरोग्य सुधारावे. पेरणीपूर्वी माती परीक्षण करून त्याच्या आधारे रासायनिक खतांचा संतुलित व गरजेनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर**: जस्त (Zinc), बोरॉन (Boron), मँगनीज (Manganese) आणि मॅग्नेशियम (Magnesium) यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता पिकामध्ये आढळल्यास आवश्यकतेनुसार योग्य सूक्ष्म अन्नद्रव्यांची लक्षित पर्णीय फवारणी करून कमतरता दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (IDM)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात:** मातीजन्य तसेच पर्णीय रोगकारकांचे व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये योग्य शेत स्वच्छता, तसेच पिकाची निरोगी वाढ व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी बियाणे व जमिनीत जैविक कीडनाशके (बायोपेस्टीसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा प्रक्रिया म्हणून वापर करावा.
- **पानांवरील रोगांचा प्रादुर्भाव नियंत्रित करावा:** जास्त आर्द्रतेच्या कालावधीत शेताचे नियमित निरीक्षण करावे. रोगाचा जलद विकास व प्रसार होण्यासाठी अनुकूल वातावरणीय परिस्थिती निर्माण झाल्यासच शिफारशीत बुरशीनाशकांची योग्य प्रमाणात व गरजेनुसार फवारणी करावी.

### एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM)

- **शेताचे नियमित निरीक्षण करावे:** रसशोषक किडी जसे फुलकिडे, मावा, तुडतुडे आणि कोळी तसेच बोंडअळ्यांचा प्रादुर्भाव तपासण्यासाठी दर आठवड्याला शेताचे नियमित सर्वेक्षण व निरीक्षण करावे.
- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करावा:** हंगामाच्या सुरुवातीपासून कामगंध सापळे लावून प्रौढ पतंगांची हालचाल व संख्या यांचे निरीक्षण करावे. त्याद्वारे अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेऊन प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या अवस्थेत सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा प्राथमिक उपाय म्हणून वापर करावा.

- **नैसर्गिक शत्रूंचे संवर्धन करावे:** ढालकिडे, लेसविंग्ज आणि बिग-आयड बग्स यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संरक्षण करावे. यासाठी सर्वसाधारणपणे अनेक किडींवर परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक व मित्रकिडींवर कमीतकमी परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांना प्राधान्य द्यावे.
- **रासायनिक कीटकनाशकांचा वापर मर्यादित ठेवावा:** लेबलवर शिफारस केलेल्या रासायनिक कीटकनाशकांचा वापर अंतिम उपाय म्हणूनच करावा. किडींची संख्या निर्धारित आर्थिक नुकसान पातळी (ETL) ओलांडल्यानंतरच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी.

## बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ऑगस्ट | | | | | | | सप्टेंबर | | | | |
| | | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| | धुळे | | | | | | | | 0.8 | 0.6 | 1.1 | 4.4 | 2.4 |
| | नंदुरबार | | | | | | | | 1.1 | 1.2 | 2.1 | 3.6 | 4.2 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.8 | 0.6 | 3.5 | 7 | 3 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0.8 | 1 | 1.2 | 0.6 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.8 | 0.8 | 2.3 | 1.8 | 1.8 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 1.6 | 2 | 1 | 1.5 |
| | बीड | | | | | | | | 0.5 | 1.1 | 0.4 | 0.4 | 0.3 |
| | नांदेड | | | | | | | | 0.7 | 1.7 | 1.9 | 0.9 | 1 |
|  | परभणी | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.5 | 2.4 | 0.9 | 0.8 | 1.1 |
| | हिंगोली | | | | | | | | 0.7 | 3.1 | 1.2 | 1.9 | 1.6 |
| | बुलढाणा | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.6 | 1.7 | 4.8 | 3 | 2.3 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.4 | 3.9 | 7 | 5.1 | 2.4 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.8 | 3.8 | 2.2 | 6.2 | 2.5 |
| | अमरावती | 0 | 14 | 11 | 0 | 3 | 0 | 0 | 1.7 | 12 | 14 | 11.6 | 3.8 |
| | यवतमाळ | 0 | 6 | 0 | 0 | 19 | 0.4 | 0 | 1.2 | 3.7 | 2.2 | 5.1 | 2.2 |
| | वर्धा | 0 | 1 | 0 | 2 | 17 | 0 | 0 | 2.3 | 13 | 8.6 | 7.2 | 3 |
| | नागपूर | 0 | 1 | 2 | 6.9 | 10.7 | 0.2 | 0 | 3.8 | 21 | 15 | 6.6 | 4.5 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 0 | 1.3 | 4.3 | 4.2 | 4.8 | 3.8 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

**अकोला** येथे पेरणी केलेले पीक ५७ ते ६२ दिवसांचे असून सध्या पाते फुटण्याच्या (स्क्वेअरिंग) व फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. कोळपणी व निंदणीची कामे करण्यात आली आहेत. तणनाशके, कीटकनाशके, बुरशीनाशके तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या फवारण्या सुरू आहेत. अहवालाच्या आठवड्यात दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्याचे आढळून आले. काही शेतांमध्ये तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला.

भारतीय कृषी संशोधन परिषद- केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील शास्त्रज्ञांच्या पथकाने नुकत्याच केलेल्या पाहणीमध्ये, बुलढाणा व अकोला जिल्ह्यांतील काही भागांमध्ये दीर्घकाळ पावसाचा खंड व त्यासोबत निर्माण झालेल्या जमिनीतील ओलाव्याच्या ताणामुळे फ्युजेरियम मर आणि मॅक्रोफोमिना कोरडी मूळकूज या रोगांचा तीव्र प्रादुर्भाव आढळून आला.

**राहुरी** येथे पेरणी केलेले बागायती कापूस पीक पेरणीच्या वेळेनुसार ५७ ते ९२ दिवसांचे असून सध्या पाते लागणे, फुलोरा व बोंड विकासाच्या अवस्थेत आहे. पाणी देणे, कोळपणी, निंदणी, फवारणी तसेच खतांचा वापर करण्यात आला आहे. शेतांमध्ये तणांचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. अनेक शेतांमध्ये फुलकिड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) अधिक आढळून आला आहे. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव डोमकळी यामध्ये आढळून आला आहे. मायलोसेरस भुंग्यामुळे सुमारे १% कापूस झाडांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) चा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

**नांदेड** येथे पेरणी केलेले कापूस पीक ५३ ते ७८ दिवसांचे असून सध्या पाते लागणे ते बोंडधारणा अवस्थेत आहे. आंतरमशागत, निंदणी, खतांचा वापर, पीक संरक्षणाच्या उपाययोजना तसेच वाढ नियंत्रकाची फवारणी सुरू आहे. शेतांमध्ये गवतवर्गीय तणांमध्ये हरळी, सांवा, कुंदा तसेच रुंद पानांच्या तणांमध्ये तांदुळजा, घोळ, चाकवत, हिरवी वेल, काँग्रेस गवत, भूईआवळा व माठ यांचा, तसेच लव्हाळा व नागरमोथा यांचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. तुडतुडे व मावा यांचा प्रादुर्भाव आढळून आला; मात्र तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे. कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**पीकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी कापूस पिकामध्ये ओलावा संवर्धनासाठी ४५-५० दिवसांनी सऱ्या पाडाव्यात. कापूस पिकामध्ये कोळपणी व निंदणी यांसारखी आंतरमशागतीची कामे करावीत. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २-२.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी शिफारशीनुसार तणनाशकाची फवारणी करावी. बागायती संकरित कापूस पिकासाठी नत्राचा पहिला हप्ता ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रति हेक्टर) तसेच कोरडवाहू संकरित/हिरसुटम कापूस पिकासाठी ४५ किलो नत्र (९७ किलो युरिया प्रति हेक्टर) वरखत म्हणून द्यावे. मावा, तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी तसेच कापसाच्या पात्यांवर गुलाबी बोंडअळीच्या मादी पतंगांनी अंडी घालू नयेत यासाठी एनएसकेई ५% + कडुनिंब तेल ५ मिली प्रति लिटर पाणी किंवा कडुनिंब तेलावर आधारित ३०० किंवा १५०० पीपीएम उत्पादने @ ५ मिली प्रति लिटर पाणी + १ ग्रॅम कपडे धुण्याचा डिटर्जंट यांचे द्रावण तयार करून फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी शेतात प्रति एकर २ कामगंध सापळे लावावेत. किडींच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी प्रति एकर २० झाडे प्रातिनिधिक स्वरूपात निवडून नियमित पाहणी करावी. पॅराविल्ट आढळल्यास दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची एक आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. फ्युजेरियम मर व मॅक्रोफोमिना मूळकूजग्रस्त भागात रोगाचा प्रसार रोखण्यासाठी बाधित झाडे मुळासकट उपटून त्वरित नष्ट करावीत. आजूबाजूच्या झाडांना कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणाची आळवणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोडर्मा हर्जियानम किंवा @ ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणाची दोन वेळा आळवणी करावी. उच्च घनता लागवड पद्धतीने (९० × १५ सेंमी) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० सेंमी) कापूस लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी पीक ४०-४५ दिवसांचे झाल्यावर किंवा पाते लागण्यास सुरुवात झाल्यावर पिकाची वाढ नियंत्रक (PGR) मेपिक्वाट क्लोराइड ५% एएस @ १ मिली प्रति लिटर पाणी याची फवारणी करावी. त्यानंतर १५-२० दिवसांनी @ १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. मात्र, दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यामुळे पिकामध्ये ओलावा ताण असल्यास मेपिक्वाट क्लोराइडची फवारणी करू नये. त्याऐवजी १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून पर्णीय फवारणी करावी. कापसामध्ये पातेगळ होत असल्यास, पाते व फुलांची नैसर्गिक गळ टाळण्यासाठी एनएए @ ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पर्णीय फवारणी करावी.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ६० दिवसांनी खताचा दुसरा हप्ता द्यावा. कापूस पीक तणमुक्त ठेवण्यासाठी नियमितपणे कोळपणी व निंदणी करावी. शक्य असल्यास ट्रॅक्टर किंवा बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागत करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) तसेच फुलकिड्यांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कापूस शेतातील व बांधावरील काँग्रेस गवत तण काढून नष्ट करावे. जमिनीत पुरेसा ओलावा असल्याने हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांच्या नियंत्रणासाठी

क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २-२.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची शिफारशीनुसार फवारणी करावी. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावासाठी शेताचे नियमित निरीक्षण करावे. पिकामध्ये पिवळे चिकट सापळे लावावेत. तसेच निंबोळी बियांचा अर्क (एनएसकेई) ५% किंवा अझाडिरॅक्टिन १०,००० पीपीएम @ १० मिली प्रति १० लिटर पाणी यांची फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त असल्यास, फ्लोनिकामिड ५० डबल्यूजी @ २ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा ब्युप्रोफेझिन २५ एससी @ २० मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे लावावेत. गुलाबी बोंडअळीची पुढील पिढी तयार होऊ नये यासाठी गुलाबासारखी गुंडाळलेली डोमकळी त्यामधील गुलाबी बोंडअळीच्या अळ्यांसह नियमितपणे गोळा करून नष्ट करावीत. उच्च घनता लागवड पद्धतीत (९० × १५ सेंमी) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० सेंमी) कापूस लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी पीक ४०-४५ दिवसांचे झाल्यावर किंवा पाते लागण्यास सुरुवात झाल्यावर मेपिक्वाट क्लोराइड ५% एएस @ १ मिली प्रति लिटर पाणी या वाढ नियंत्रकाची फवारणी करावी. त्यानंतर १५-२० दिवसांनी पुन्हा १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. मात्र, दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यामुळे पिकामध्ये ओलावा ताण असल्यास मेपिक्वाट क्लोराइडची फवारणी करू नये. अशा परिस्थितीत त्याऐवजी १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून पर्णीय फवारणी करावी. कापसामध्ये पातेगळ होत असल्यास, पाते व फुलांची अनावश्यक गळ कमी करण्यासाठी एनएए @ ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पर्णीय फवारणी करावी. ९० × ३० सेंमी अंतरावर कापूस लागवड केलेल्या आणि वाढ नियंत्रकाची फवारणी न करणाऱ्या शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडिया म्हणजेच एकाच दिशेने वाढणाऱ्या फांद्या काढाव्यात आणि ७५-८० दिवसांनी शेंडा खुडणी करावी. कापसामध्ये पॅराविल्ट आढळल्यास लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची एक आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार टाळण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे. फुलकिड्यांच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर २० निळे चिकट सापळे, तर नियंत्रणासाठी प्रति हेक्टर १०० निळे चिकट सापळे लावावेत. टीएसव्ही बाधित झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत आणि रोगाचा प्रसार रोखण्यासाठी शेताची स्वच्छता राखावी. विशेषतः कापूस शेतात तसेच शेताच्या बांधावर व आजूबाजूला असलेले काँग्रेस गवत तण काढून नष्ट करावे. फुलकिड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त असल्यास शिफारशीत कीटकनाशकांची योग्य मात्रा व योग्य पद्धतीने फवारणी करून प्रभावी नियंत्रण करावे.

नांदेड भागातील शेतकऱ्यांनी कापसाच्या शेतातील तण नियंत्रणासाठी वेळोवेळी कोळपणी, निंदणी आणि आंतरमशागत करावी. जमिनीत ओलावा जास्त असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतासारखी तणे जास्त असतील तर क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मिली प्रति लिटर पाणी, रुंद पानांची तणे असतील तर पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मिली प्रति लिटर पाणी किंवा दोन्ही प्रकारची तणे असतील तर पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २ ते २.५ मिली प्रति लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची शिफारशीनुसार फवारणी करावी. बागायती कापसाला पेरणीनंतर ६० दिवसांनी नत्र ६० किलो प्रति हेक्टर वरखत म्हणून द्यावे. कोरडवाहू कापसाला पेरणीनंतर ३० दिवसांनी नत्र ४८ किलो प्रति हेक्टर ओळीमध्ये किंवा झाडाभोवती वर्तुळ करून द्यावे. युरिया शेतात पसरून देऊ नये. उच्च घनता लागवड पद्धतीने किंवा कमी अंतरावर लावलेल्या बीटी कापसामध्ये पाते लागण्याच्या वेळी मेपिक्वाट क्लोराइड ५% @ ५०० मिली प्रति हेक्टर फवारावे. रसशोषक किडी जसे तुडतुडे, मावा, फुलकिडे यांच्यासाठी पेरणीनंतर ३० दिवसांनी निंबोळी बियांचा अर्क (एनएसकेई) ५% फवारावा. पीक ६० दिवसांपेक्षा जास्त झाले असेल आणि रसशोषक किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त झाली असेल तर ब्युप्रोफेझिन २० एससी @ १००० मिली प्रति हेक्टर किंवा डायनोटेफ्युरॉन २० एसजी @ १५० ग्रॅम प्रति हेक्टर यापैकी शिफारशीत कीटकनाशकाची फवारणी करावी. शेत आणि शेताचे बांध नेहमी तणमुक्त ठेवावेत. फुलकिड्यांची संख्या वाढू नये आणि तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी शेतात व शेताच्या आजूबाजूला असलेले काँग्रेस गवत काढून नष्ट करावे. कापसामध्ये पॅराविल्ट दिसून आल्यास लक्षणे

दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी यापैकी योग्य द्रावणाची आळवणी करावी. ही आळवणी एक आठवड्याच्या अंतराने २ ते ३ वेळा करावी. कापसाच्या पानांवर ठिपके पडणे आणि बोंड सडणे यासाठी कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी @ ३० ग्रॅम किंवा प्रोपिकोनाझोल २५% ईसी @ १० मिली किंवा ॲझोक्सीस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनाझोल ११.४% एससी @ १० मिली किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड १६७ ग्रॅम/लिटर + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी @ ६ मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी शिफारशीत बुरशीनाशकाची फवारणी करावी. ९० × १५ सेंमी किंवा ९० × ३० सेंमी अंतरावर कापूस लावलेल्या शेतकऱ्यांनी पीक ४०-४५ दिवसांचे झाल्यावर किंवा पाते लागण्यास सुरुवात झाल्यावर मेपिक्वाट क्लोराइड ५% एएस @ १ मिली प्रति लिटर पाणी फवारावे. त्यानंतर १५-२० दिवसांनी पुन्हा १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. मात्र, पावसाचा बराच काळ खंड पडून पिकाला पाण्याची कमतरता किंवा ओलावा ताण असेल तर मेपिक्वाट क्लोराइडची फवारणी करू नये. अशावेळी त्याऐवजी १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कापसाची पाते गळत असल्यास पाते व फुले जास्त गळू नयेत यासाठी एनएए @ ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.


**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

Dr. G. T. Behere, Dr. A. S. Tayade, Dr. A. H. Prakash, Dr. S.K. Verma
Dr. S.K. Sain, Dr. Rishi Kumar, Dr. Babasaheb B. Fand, Dr. Ramkrushna GI
Dr. S.P Gawande, Dr. Shivaj Thube, Dr. R.R. Chapke

**Regional language translation**:
**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani